# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
## ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०० ०५१.

दिनांक : १९ जानेवारी, २००७

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७(१) व १५४ अन्वये

## सूचना

क्र. झोपुप्रा/ससंनर/धापुप्र/विनिनि/०१/०७ : ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. डिसीआर १०९० /आर डी पी/युडी ११ दिनांक २० फेब्रुवारी १९९१ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६( या पुढे "उक्त अधिनियम" असे संबोधलेले) चे कलम ३१ खाली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली, १९९१ला मंजूरी दिली असून ती दिनांक २५ मार्च, १९९१ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे उक्त नियमावली असे संबोधलेले).

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने दिनांक १६ डिसेंबर १९९५ च्या अधिसुचना क्र. झोपुयो-१०९५/प्र.क्र.३७/गृ.नि. सेल अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ (अ) मधील तरतुदींच्या अधीन राहून "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची" नियुक्ती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राची अंमलबजावणी करण्यासाठी उक्त अधिनियमातील कलम २(१९) नुसार उक्त अधिनियमात अभिप्रेत असणारा नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या गृहनिर्माण विभागाने निर्णय क्र. झोपुयो २००३/प्र.क्र.१८९/झोपुसु-१ दिनांक ४/२/२००४ नुसार धारावी क्षेत्राचा सेक्टर नकाशावर आधारीत व्यापक विकास करण्याचे निश्चित केलेले असुन धारावी क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. (यापुढे "उक्त निर्णय" असे संबोधावे).

आणि ज्याअर्थी शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसुचना क्र. टीपीबी ४३०४/३२२/ सीआर-५६/०४/युडी-११ दिनांक ९/३/२००५ अन्वये धारावी अधिसुचित क्षेत्राचे नियोजन व पुनर्विकास

करण्यासाठी उक्त अधिनियमातील कलम ४० मधील उपकलम (१ ब) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे. (यापुढे "उक्त प्राधिकरण "म्हणुन संबोधलेले).

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने त्यांचेकडील पत्र क्र. झोपुप्रा/ससंनर/धापुप्र/विनिनि/०१/०६ दि.२१/४/२००६ अन्वये उक्त निर्णयातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी जसे ४.००या मर्यादे पर्यंत जागेवरील चटई क्षेत्र निर्देशांक वापरणेकरीता सद्याच्या वापरातील विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आवश्यक असल्याचे शासनास कळविलेले आहे .धारावी अधिसुचित क्षेत्राचा अभ्यास करताना असे दिसुन आले की, तेथे जुन्या इमारती, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भाडेतत्वावरील इमारती तसेच राजीव गांधी निवारा प्रकल्पाअंतर्गत बांधलेल्या इमारती हया जुन्या व मोडकळीस आलेल्या अथवा दुरुस्तीसदृष्य आहेत. त्यामुळे सुव्यवस्थीत नियोजनाच्या दृष्टीने नागरी नुतनीकरण योजनेअंतर्गत पुर्नविकासाकरीता त्यांचा विचार होणे आवश्यक आहे. सध्याच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेप्रमाणे विकास आराक्षणांचा अंशत: विकास करण्याच्या तरतुदीऐवजी धारावी पुर्नवसन प्रकल्पाअंतर्गत धारावी अधिसुचित क्षेत्रामधील मंजुर विकास आराखड्यातील सर्व सार्वजनिक प्रयोजनाच्या आरक्षणांचा १००%विकास, वाढीव सार्वजनिक सोई-सुविधांचे निर्माण, पायाभुत सोई सुविधांच्या सुधारणांसह करण्याचे प्रस्तावीत आहे. त्यामुळे सध्याच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीचे मुळ स्वरुप न बदलता, उक्त नियमावलीत काही प्रमाणात बदल करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने आदेश क्र. टीपीबी ४३०६/२५९३/सीआर-२०४/०६/युडी-११ दि. २०/११/२००६अन्वये योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी सोबत जोडलेल्या अनुसुचीप्रमाणे उक्त नियमावलीमध्ये फेरबदल करून नियम क्र. २७ (अ), ३३(९)(अ) व ३३(१०)(अ) समाविष्ट करण्याचा निदेश उक्त प्राधिकरणास उक्त अधिनियमातील कलम ३७(१) सहकलम १५४ नुसार दिलेले आहेत.(यापुढे उक्त फेरबदल संबोधिलेला)

त्याअर्थी आता, उक्त प्राधिकरण, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) मधील तरतूदी अन्वये उक्त फेरबदलावर जनतेकडून ही सुचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सुचना/ हरकती मागवित आहे.

उक्त फेरबदल दर्शविणाऱ्या प्रती (सोबत जोडलेल्या अनुसुचीनुसार) उक्त प्राधिकरणाच्या कार्यालयात तसेच धारावी अधिसुचित क्षेत्रातील उक्त प्राधिकरणाच्या राहुल उत्कर्ष ममता को. ऑप. हौ. सोसायटी, आंबेडकर नगर, माटुंगा लेबर कॅम्प, धारावी, मुंबई - १७ या स्थानिक कार्यालयात तसेच उपसंचालक नगर रचना, बृहन्मुंबई, एनसा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई, आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई-२३,जिल्हाधिकारी मुंबई शहर, मुंबई-२३ यांच्या कार्यालयात अवलोकनार्थ ठेवल्या आहेत. तसेच उक्त फेरबदल (अनुसुचीसह) हे उक्त प्राधिकरणाच्या www.sra.gov.in या संकेतस्थळावर सुद्धा प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

ज्या कोणास उक्त फेरबदलांवर (सोबत जोडलेल्या अनुसुचीप्रमाणे) हरकती / सुचना नोंदवावयाच्या असतील त्यांनी, ही सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात , मुख्य कार्यकारी अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, (धा.पु.प्र.), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०००५१ यांना पाठवाव्यात. तीस दिवसांच्या विहीत कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या सुचना / हरकतीवर विचार केला जाणार नाही.

**(आय.एस.चहल)**
**विशेष कार्य अधिकारी,**
**धारावी पुनर्वसन प्रकल्प**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**